महाराष्ट्र शासन
वन विभाग

# वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली यांचे कार्यालय.

वन प्रशासकिय भवन, पोटेगाव रोड, गडचिरोली (महाराष्ट्र)
दुरध्वनी क्रमांक- 07132-233184 फॅक्स क्रमांक & 07132-233187 Email- ccfgad@gmail.com

क्रमांक:-कक्ष-2(8)/जमीन/प्र.क्र 204/2023/जा.क्र. 2746 गडचिरोली],दिनांक:- 23 /10/2023

विषय:- **वन संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत क्षेत्र 5.00 हे. वनजमीन. मौजा कसनसुर ता. एटापल्ली उप पोलिस स्टेशन केंद्राकरीता कायम स्वरुपी बांधकामबाबतचा प्रस्ताव.**

संदर्भ:- 1)महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, मुंबई यांचे पत्र क्र. FLD-2022/CR-292/F-10 दि.24.11.2022
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-17/नोडल/FCA/PID-12674/गडचिरोली/2228 दि.02.12.2022
3) उपवनसंरक्षक (प्रा.), भामरागड यांचे कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष 1/सर्व्हे/प्र.क्र. 506/1771 दि. 09.10.2023
4)या कार्यालयाचे पत्र क्र. 2(8)/जमीन/प्र.क्र.204/872 दि. 12.10.2023
5) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-17/नोडल/FCA-SI/PID-34038/गडचिरोली/2121 दि.13.10.2023

---ooo---

वन संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत क्षेत्र 5.00 हे. वनजमीन मौजा **मौजा कसनसुर ता. एटापल्ली उप पोलिस स्टेशन केंद्राकरीता कायम स्वरुपी बांधकामबाबतचा प्रस्ताव** केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य नागपुर यांना सादर करण्यात आला असता केंद्रस्थ अधिकारी म.रा. नागपुर यांचेकडुन दि. 27.09.2022 रोजी महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावात संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये त्रुटी काढुन त्रुटी पुर्तता अहवाल सादर करण्याकरीता या कार्यालयास कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे उपवनसंरक्षक यांचेकडुन संदर्भिय पत्र क्र. 3 प्रमाणे अहवाल प्राप्त करुन केंद्रस्थ अधिकारी म.रा. नागपुर यांना संदर्भिय पत्र क्र. 4 प्रमाणे त्रुटी पुर्तता करुन अहवाल सादर करण्यात आला होता. सदर अहवाल केंद्रस्थ अधिकारी यांचे कार्यालयाकडुन तपासनी केली असता संदर्भिय पत्र क्र. 5 अन्वये पत्रात नमुद असल्याप्रमाणे त्यामध्ये 1 ते 3 त्रुटी आढळुन आलेल्या आहेत.

तरी, उपवनसंरक्षक (प्रा.), भामरागड यांनी **संदर्भिय पत्र क्र. 1 , 2 व 5 मध्ये नमुद त्रुटीची मुद्येनिहाय पुर्तता करुन तात्काळ सुधारीत परीपुर्ण अहवाल 04 प्रतित आवश्यक दस्ताऐवज, KML File व आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयात सादर करावा.** करीता अहवालाच्या 03 प्रति परत करण्यात येत आहे. यासोबत संदर्भिय पत्राची छायांकीत प्रत देण्यात येत आहे.

सहपत्र:- वरीलप्रमाणे अहवालाच्या 03 प्रति

(एस.रमेशकुमार)
वनसंरक्षक (प्रादेशिक),गडचिरोली.

20/10/2023

प्रति,
उपवनसंरक्षक (प्रा.),
भामरागड वनविभाग, स्थित आलापल्ली

प्रतिलिपी:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपुर यांना माहीतीस सादर.
प्रतिलिपी:- पोलिस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली यांना उचित कार्यवाहीस अग्रेषित.

E/Police Proposal Letter File/C-I

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, पहिला माळा, बी विंग
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
दुरध्वनी क्र.०७१२-२५५६९१६, ई-मेल: apccfnodal@mahaforest.gov.in

**ई-मेलव्दारे / स्पिडपोस्टव्दारे** क्र.कक्ष-१७/FCA-S1/PID-३४०३८/गडचिरोली/2929
नागपूर ४४० ००१, दिनांक13/१०/२०२३

प्रति,
वनसंरक्षक (प्रा.),
गडचिरोली

विषय :- Proposal for diversion of 5.00 ha. forest land under Forest (Conservation) Act, 1980 for construction of administrative building with other infrastructure of Sub Police Station Kasansur in Compt. No.80 and Survey No.93 at Village-Kasansur, Taluka-Ettapalli, District-Gadchiroli in the State of Maharashtra.

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, पत्र क्र.एफलडी-२०२२/ प्र.क्र.२९२/फ-१०, दि.२४/११/२०२२.
२. वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली यांचेकडील पत्र क्र.कक्ष-२(८)/जमीन/प्र.क्र. ३७०/२०२३/८७२, दि.१२/१०/२०२३.

विषयांकीत प्रकरणी संदर्भ क्र.१ येथे नमुद पत्रान्वये शासनाकडून उपस्थित करण्यात आलेल्या मुद्याबाबतचा अहवाल वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली यांचेकडील संदर्भ क्र.२ येथे नमुद पत्रान्वये या कार्यालयास सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाची तपासणी केली असता, खालील त्रृट्या आढळून येत आहेत.

१. मुद्दा क्र.१ च्या पुर्ततेच्या अनुषंगाने प्रस्तावित वनक्षेत्र हे राष्ट्रीय उद्यान, वन्यजीव अभयारण्य तथा नेचर रिझर्व्हचा भाग नसल्याबाबतचे उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही.
२. मुद्दा क्र.२ च्या पुर्ततेच्या अनुषंगाने विभागीय व वृत्तस्तरीय कार्यालयाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय आवश्यक दस्तऐवज व KML file सह सादर करण्यात आलेले नाही.
३. मुद्दा क्र.३ च्या पुर्ततेच्या अनुषंगाने पर्यायी वनीकरणासाठी नवीन जागा निश्चित केली असल्याबाबतचे कळविण्यात आले आहे, मात्र त्याबाबतच्या सादर करण्यात आलेल्या KML file मध्ये पर्यायी वनीकरणासाठी निवड केलेल्या क्षेत्राचा Polygon, जिल्हा, वन विभाग, वनपरिक्षेत्र, वनपरिमंडळ, नियतक्षेत्र, गावाचे नाव, कक्ष क्रमांक, हे. या एककात क्षेत्र, वैधानिक दर्जा दर्शविण्यात आलेला नाही.

उपरोक्त नमुद त्रृटींच्या पुर्ततेसह उपरोक्त नमुद अहवालची पुनर्रचना करून तीन प्रतीत अहवाल मुद्देनिहाय पुर्ततेच्या अनुषंगाने विभागीय व वृत्तस्तरीय कार्यालयाच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तसेच आवश्यक दस्तऐवज व KML files सह या कार्यालयास सादर करण्यात आल्यास त्यानुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करता येईल.

सहपत्र:- प्राप्त अहवालाच्या तीन प्रती

13/X/23

(नरेश झुरमुरे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, भामरागड वनविभाग, आलापल्ली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस.
प्रलिलिपी:- पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.
(E-mail: sp.gadchiroli@mahapolice.gov.in)